विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
स्वररंग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/४३७ दिनांक : १५/०७/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
<u>पुणे जिल्हयातील</u> सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदार नावनोंदणी अभियान राबविणेबाबत...**
**संदर्भ : उभूसंक्र.१३/आस्था–१/कावि/०३/२०२४ दिनांक ०४/०७/२०२४ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/२०२३ ERS(Vol III) दि. २०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०१/०७/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर झालेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत दिनांक २५/६/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीमध्ये मतदार म्हणून व्यक्तीचे मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, स्थलांतरित असलेच त्यांची नावे वगळणे, नावामध्ये /पत्त्यामध्ये दुरुस्ती करणे, मतदान केंद्र बदलणे इत्यादी स्वरुपाची कामे केली जाणार आहेत. तसेच त्या अनुषंगाने दिनांक ०१/०७/२०२४ पासून नव युवा मतदार नोंदणी अभियान घेण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी निर्देश दिलेले आहेत.

या संबंधीचे सविस्तर पत्र, आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. मा. जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमध्ये जिल्हयातील १८–१९ या वयोगटातील युवकांची संख्या व मतदार नोंदणी झालेल्या युवकांची संख्या यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसून येत असल्याने सदर युवा मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील नव युवा मतदार युवकांची नोंदणी करावी. सदर सूचना आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात. (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे.

नव युवा मतदार नोंदणी अभियान संबंधित विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी /सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी समन्वय साधून तसेच विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

या अभियानांतर्गत आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती शासनास एकत्रित सादर करावयाची असल्याने नवमतदार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती (नाव, जन्म दिनांक, लिंग) ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unipune.ac.in - BOD – BOD online – Login – college Login (Enter Username & Passward) – Important Links – विशेष नवमतदार नोंदणी अभियान अहवाल या लिंकवर आणि जिल्हयाच्या व्हॉट्स अप ग्रुपवर) अशा दोनही ठिकाणी शिबीर संपन्न झाल्यानंतर त्याच दिवशी तात्काळ भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

SVEEP

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १
इमेल आयडी - slaopune१३@gmail.com

---

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/ ०३ /२०२४ दिनांक - ४ /०७/२०२४

<u>निवडणूक तात्काळ</u>

**प्रति,**

सर्व मतदार नोंदणी अधिकारी, सहा.मतदार नोंदणी अधिकारी,
१९५-जुन्नर, १९६-आंबेगाव, १९७-खेड, १९८-शिरुर, १९९-दौंड, २००-इंदापुर, २०१-बारामती, २०२-पुरंदर, २०३-भोर/वेल्हा/मुळशी, २०४-मावळ,२०५-चिंचवड, २०६-पिंपरी, २०७-भोसरी, २०८-वडगावशेरी, २०९-शिवाजीनगर, २१०-कोथरुड, २११-खडकवासला,२१२-पर्वती, २१३-हडपसर, २१४-पुणे कॅन्टोन्मेंट, २१५-कसबापेठ.

**विषय:- आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
महाविद्यालयांमध्ये मतदार नावनोंदणी अभियान राबविणेबाबत
संदर्भ:- उपजिल्हाधिकारी निवडणूक शाखा यांचेकडील पत्र
क्र. पीईई-/कावि/१४५९/२०२४ दि. २१/०६/२०२४

मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/२०२३ ERS(Vol III) दि. २०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि. ०१/०७/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्या अनुषंगाने आपले अधिनस्त पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये दि.०१/०७/२०२४ पासून नव युवा मतदार नोंदणी अभियान घेण्यात यावे.

दि. २५/०६/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीमध्ये मतदार म्हणून व्यक्तीचे मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, मयत/स्थलांतरित असलेस त्यांची नावे वगळणे, नावामध्ये/पत्यामध्ये दुरुस्ती करणे, मतदान केंद्र बदलणे इत्यादी स्वरुपाची कामे केली जाणार आहेत.

सदर कार्यक्रमांतर्गत विधानसभा निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी प्रारूप यादी दि. २५/०७/२०२४ रोजी जाहीर होणार असून, सदर यादीत नावे नसलेल्या मतदारांनी नाव समाविष्ट करणेकरिता नमुना नं ६ अर्ज करणे. मतदाराच्या नावात दुरुस्ती वा इतर बदल करावयाचे असल्यास नमुना नं ८ अर्ज भरणे व मयत मतदारांची, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांची नावे वगळणेकरिता नमुना नं ७ चा अर्ज भरणे याकरिता दि. ०९/०८/२०२४ ही अंतिम दिनांक निश्चित करण्यात आली असून या कालावधीत प्राप्त होणाऱ्या अर्जांवर नियमोचीत कार्यवाही करून अंतिम मतदार यादी दि. २०/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे.

त्याअनुषंगाने नव युवा मतदार नोंदणी अभियान संबंधित विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी महाविद्यालयांत समन्वय साधून दैनंदिन वेळापत्रक तयार करणेत यावे, त्यानुसार महाविद्यालयांमध्ये मतदार नोदणी कार्यक्रमाची आधी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी देवून उपक्रम राबविण्यात यावे. जिल्ह्यातील १८-१९ या वयोगटातील नवयुवकांची संख्या व मतदार नोंदणी झालेल्या युवकांची संख्या यामध्ये मोठ्याप्रमाणावर तफावत दिसून येत असल्याने सदर नवयुवा मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. सदर कार्यक्रमातील मतदार नोंदणी अभियानाचा दैनंदिन अहवाल Spreadsheet मध्ये नोंदविण्यात यावा.

(डॉ. सुहास दिवसे)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत:-१. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनामाहितीस्तव सविनय सादर.
२.उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचेकडे माहितीसाठी.

प्रति:-१.मा. कुलगुरू , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे २. सह संचालक उच्च शिक्षण, पुणे विभाग,१७, आंबेडकर रोड, कॅम्प पुणे-१७. ३.विभागीय सह संचालक तंत्र शिक्षण पुणे विभाग ४. शिक्षण अधिकारी पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे माहितीसाठी व पुढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी.